BDC LIBRARY
News Paper Clipping
A.Y. 2025-26

# पाटण महोत्सवात कला, संस्कृती, परंपरेचा अनोखा संगम

वार्ताहर
पाटण

'पाटण महोत्सव'च्या दिमाखदार सोहळ्यास प्रेक्षकांचा अभूतपूर्व प्रचंड प्रतिसाद लाभला. आधुनिक शेती तंत्रज्ञानासह विविध उद्योग, व्यवसाय, गृह उद्योग तसेच महिला बचत गटांना यानिमित्ताने व्यासपीठ निर्माण झाले. या सोहळ्याने कला, संस्कृती, परंपरेचा अनोखा संगम अनुभवला. तीन दिवस लाभलेल्या प्रचंड प्रतिसादामुळे महोत्सवातून 'लोकोत्सवा'चे दर्शन घडले.

येथील कोयना एज्युकेशन सोसायटी, बाळासाहेब देसाई कॉलेज व रोटरी क्लब, पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने २८ फेब्रुवारी ते २ मार्च 'पाटण महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले होते. माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या महोत्सवात शेती, उद्योग, विविध व्यवसाय तसेच गृह उद्योग व महिला बचत गटांच्या उत्पादित वस्तूंच्या प्रदर्शन व विक्रीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



पाटण : स्टॉलधारकांशी चर्चा करताना माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर. समवेत याज्ञसेन पाटणकर व मान्यवर.

यशस्वी व्यावसायिक तसेच शेतकऱ्यांनी यानिमित्ताने केलेल्या अनुभव कथनामुळे भावी पिढीला प्रोत्साहन मिळाले. राजकीय क्षेत्रासह शेती, उद्योग, व्यवसायाचा दांडगा अनुभव असलेल्या माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी नोकरी मागण्यापेक्षा नोकऱ्या निर्माण करणारे उद्योजक होण्याचे केलेले आवाहन तसेच निसर्गाचे वरदान लाभलेल्या पाटण तालुक्यात पर्यटनासह शेती व इतर क्षेत्रात समोर असलेल्या संधी निदर्शनास आणून नवउद्यमशील पिढीला मार्गदर्शन केले.

सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबर विविध क्षेत्रातील मान्यवरांची व्याख्याने, लहान मुलांसाठी खेळ, खेळणी तसेच मनोरंजनासह करमणुकीच्या कार्यक्रमांचा तसेच महोत्सवाचा जिल्ह्यातील नागरिकांनी आनंद लुटला. साध्या भेळ, बिस्कीटपासून थालीपीठासारखे पारंपरिक पदार्थ तसेच दाक्षिणात्य, चायनीज ते अगदी खिमा पाव, वडे मटणाच्या स्टॉलवर खवैय्यांची झुंबड उडाली. विविध वस्तू खरेदीसाठी लहान मुले, आबालवृद्धांसह महिलांची गर्दी होती.

अभिनेत्री कल्याणी नंदकिशोर यांच्या उपस्थितीत 'खेळ पैठणीचा' 'जगदंबा फोक आख्यान' तसेच अभिनेते समृद्धी जाधव यांच्या 'हसण्यासाठी जन्म आपला' या कार्यक्रमांना प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, पारंपरिक कला तसेच स्थानिक कलाकारांच्या सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. विविध व्यावसायिकांसह शेती तसेच महिला बचत गटांनी थाटलेल्या स्टॉलनी लक्ष वेधले. परफेक्ट नियोजनामुळे महोत्सवाचा करेक्ट कार्यक्रम 'लोकोत्सव'च ठरला.